पत्रकार कक्ष

जावक क्रमांक ९५२/२०१९
खडकी पोलीस स्टेशन पुणे.
तारीख ०३/०३/२०१९

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- अमोल बी. भोसले, पो.उप-निरीक्षक, खडकी पोलीस स्टेशन पुणे
यांज कडुन विनंती पुर्वक की,

विषय :- अनोळखी/बेवारस मयता बाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी होणे बाबत....

महोदय,

खडकी पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि.नं. ०७/२०१९ Cr.P.C. कलम १७४ मधिल अनोळखी / बेवारस इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे हा दिनांक २८/०२/२०१९ रोजी सायंकाळी २३.१० वा. चे सुमारास दापोडी स्मशानभुमीचे पाठीमागील मुळा/पवना नदीचे पात्रात पाण्यावर तरंगत व डी कम्पोज अवस्थेत आढळून आल्याने ससून हॉस्पीटल ओपीडी मध्ये नेवून एमएलसी नं. ४९१५ दिनांक २८/०२/२०१९ अन्वये डॉक्टर पराग पी वराडे ससून हॉस्पीटल यांनी तपासणी करुन डॉक्टर तपासणी पुर्वी मयत झालेचे २३.१० वा. घोषित केल्याने त्याचे एलपीएम नं. १११५/२०१९ अन्वये पोष्टमार्टम करण्यात आले आहे. वर्णन खालील प्रमाणे.

एक पुरुष जातीचे मयत वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे अंगाने जाडजुड, रंगाने सावळा, बरेच दिवस पाण्यात बॉडी राहिलेने सडून अंगावरील व चेह-यावरील चामडी मांस डी कंम्पोजड् झालेले त्यांची अं. उंची ५ फुट ५ इंच येणे प्रमाणे वरील वर्णनाचे बेवारस पुरुष जातीचे मयत बॉडी वरील तारखेंस वेळी व ठिकाणी मिळुन आले आहे.

तरी वरील वर्णनाच्या मयताचे वारसाचा तपास होणे कामी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी होणेस विनंती आहे.